आजचे पंचांग

शुक्रवार, दि. ८ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर,
युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम
संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण,
वसंत ऋतु, वैशाख मास, कृष्णपक्ष, षष्ठी दुपारी
१२-२२ पर्यंत नंतर सप्तमी तिथी,
दिवस नक्षत्र- उत्तराषाढा रात्री ९-२० पर्यंत
चंद्र रास - मकर, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शुक्रवार, दि. ०८ मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २२२ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


### शिक्षकांना प्रशिक्षण सक्तीचे

**मुंबई:** राज्यातील सर्व शिक्षक, मुख्याध्यापक आणि पर्यवेक्षकांना आता दरवर्षी ५० तासांचे सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास प्रशिक्षण पूर्ण करणे अनिवार्य केले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार अध्यापन कौशल्ये अद्ययावत करण्यासाठी शिक्षण विभागाने हा निर्णय घेतला आहे. शालेय शिक्षण विभागाने यासंदर्भातील अध्यादेश प्रसिद्ध केला आहे. हे प्रशिक्षण सर्व माध्यमांच्या शासकीय आणि खासगी अनुदानित शाळांमधील पहिली ते बारावीच्या शिक्षकांना लागू असेल.

## सारांश वृत्त

### बिहारच्या मंत्र्यांचे मोदींकडून अभिनंदन

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारच्या नवनियुक्त मंत्र्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना विश्वास आहे की सर्वांगीण विकासाप्रति त्यांची वचनबद्धता राज्याला समृद्धीच्या नवीन उंचीवर नेईल.बिहारमधील पहिल्याच भाजपसरकारच्या मंत्रिमंडळात जेडीयू अध्यक्ष नितीशकुमार यांचे पुत्र निशांत कुमार यांच्यासह ३१ जणांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अनेक केंद्रीय मंत्र्यांच्या उपस्थितीत मंत्रिपदाची शपथ घेतली.

### महिलांवर अत्याचार करणाऱ्याची हत्या

**भुवनेश्वर :** भुवनेश्वरच्या हद्दीत दोन महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी जमावाने एका व्यक्तीला मारहाण करून ठार मारले आणि दुसऱ्याला गंभीर जखमी केले. हंसपाल-निमपारा रस्त्यावर बालियांटा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रामचंद्रपूर येथील पुलाजवळ दुपारच्या वेळी ही घटना घडली. कटकच्या शासकीय रेल्वे पोलिस दलात (जीआरपी) निलंबित कॉन्स्टेबल सौम्या रंजन स्वैन असे मृताचे नाव आहे. ओम प्रकाश मोहंती असे गंभीर जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

### नक्षलवादी हल्ल्यातील आरोपींची निर्दोष मुक्तता

**बिलासपूर :** छत्तीसगड उच्च न्यायालयाने २०१० च्या ताडमेटला माओवादी हल्ला प्रकरणातील सर्व १० आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याच्या विरोधात राज्य सरकारने दाखल केलेले अपील फेटाळून लावले आहे. मुख्य न्यायमूर्ती रमेश सिन्हा आणि न्यायमूर्ती रवींद्रकुमार अग्रवाल यांच्या खंडपीठाने आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याचा कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत खटल्यातील त्रुटींकडे लक्ष वेधले.

### पश्चिम बंगालमध्ये मोठी राजकीय उलथापालथ

# ममता बॅनर्जी मंत्रिमंडळ बरखास्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठी घडामोड घडली असून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राजीनामा देण्यास नकार दिल्यानंतर राज्यपालांनी त्यांच्या मंत्रिमंडळाला बरखास्त केल्याची माहिती समोर आली आहे. विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसचा मोठा पराभव झाल्यानंतरही सत्ता सोडण्यास नकार दिल्याने अखेर राज्यपालांनी संवैधानिक अधिकारांचा वापर करत हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

तृणमूल काँग्रेसच्या पराभवानंतर ममता बॅनर्जी यांनी निवडणूक निकालांवर गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. "हा जनादेश नसून कटकारस्थान आहे. आमचा पराभव जनतेमुळे नाही, तर निवडणूक प्रक्रियेत झालेल्या गैरप्रकारांमुळे झाला," असा आरोप त्यांनी केला होता. ममता बॅनर्जी यांनी भाजपसह भारतीय निवडणूक आयोग यांच्याविरोधातच आमची खरी लढाई होती, असा दावा केला. "सुमारे १०० जागांवर जनादेश लुटण्यात आला. मतमोजणी जाणीवपूर्वक संथ करण्यात आली. आम्हाला पराभूत करण्यासाठी संपूर्ण यंत्रणा वापरण्यात आली," असा आरोप त्यांनी केला. "आम्ही हरलेलो नाही. त्यामुळे राजभवनात जाऊन राजीनामा देण्याचा प्रश्नच येत नाही," असे म्हणत त्यांनी मुख्यमंत्रीपद सोडण्यास स्पष्ट नकार दिला होता.

दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये भाजपच्या पहिल्या सरकारच्या स्थापनेसाठी तयारी सुरू झाली आहे. ९ मे रोजी कोलकात्यातील ब्रिगेड परेड ग्राउंड येथे शपथविधी सोहळा होण्याची शक्यता आहे. या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात येणार असल्याची माहिती आहे.

या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह तसेच भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

पराभवानंतर ममता बॅनर्जी यांनी राष्ट्रीय स्तरावर इंडिया आघाडी मजबूत करण्यावर भर देणार असल्याचे सांगितले होते. सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इंडिया आघाडीतील इतर नेत्यांनी पाठिंबा दिल्याचे त्यांनी म्हटले होते. "मी आता एक सामान्य नागरिक आहे. रस्त्यावर उतरून लढणार आहे. अन्यायाविरोधातील संघर्ष सुरूच राहील," अशी प्रतिक्रिया ममता बॅनर्जी यांनी दिली होती. या घडामोडींमुळे पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठी अस्थिरता निर्माण झाली असून, पुढील काही दिवस राज्यातील राजकीय समीकरणांसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.

## दहावीचा निकाल आज होणार जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** राज्यातील लाखो विद्यार्थ्यांची प्रतीक्षा अखेर संपणार असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडून घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल उद्या, शुक्रवारी ८ मे रोजी जाहीर केला जाणार आहे. दुपारी १ वाजता हा निकाल ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध होणार आहे.

फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षेचा निकाल पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत जाहीर केला जाणार आहे. निकाल जाहीर करण्यापूर्वी सकाळी ११ वाजता राज्य मंडळाच्या कार्यालयात अधिकृत पत्रकार परिषद होणार असून त्यामध्ये निकालाची एकूण टक्केवारी, विभागनिहाय निकाल, विद्यार्थ्यांची संख्या आणि इतर महत्त्वाची माहिती जाहीर केली जाणार आहे.

गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्र बोर्डाने दहावी आणि बारावीचे निकाल विक्रमी वेळेत जाहीर करण्याची परंपरा कायम ठेवली आहे. यंदा बारावीचा निकाल २ मे रोजी जाहीर करण्यात आला होता, तर आता दहावीचा निकालही मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होत आहे. यापूर्वी दहावी-बारावीचे निकाल जून महिन्यात जाहीर होत असत. मात्र, निकाल लवकर जाहीर झाल्यामुळे पुढील प्रवेश प्रक्रिया वेळेत सुरू होण्यास मदत होत आहे. दहावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर आता अकरावी प्रवेश प्रक्रियेलाही वेग येणार आहे.

## उपमुख्यमंत्री शिंदे यांचे हेलिकॉप्टर वादळात अडकले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हेलिकॉप्टर ठाणे जिल्ह्यातील मुरबाड येथे जात असताना वादळी वाऱ्यात अडकल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सुदैवाने वैमानिकाने प्रसंगावधान राखत हेलिकॉप्टर सुरक्षितपणे मुंबईतील जुहू हेलिपॅडवर उतरवले. या घटनेत शिंदे आणि त्यांच्यासोबतचे अधिकारी सुखरूप असल्याची माहिती आहे.


एकनाथ शिंदे हे कल्याण-मुरबाड परिसरातील एका लग्न समारंभासाठी रवाना झाले होते. मात्र, मुरबाड परिसरात अचानक वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. खराब हवामानामुळे हेलिकॉप्टरला अडथळ्यांचा सामना करावा लागला. परिस्थिती गंभीर होत असल्याचे लक्षात येताच वैमानिकाने पुढील प्रवास टाळत हेलिकॉप्टर परत मुंबईकडे वळवले. वादळ आणि पावसामुळे दृश्यमानता कमी झाल्याने हेलिकॉप्टरला जुहू येथील हेलिपॅडवर आपत्कालीन स्वरूपात उतरवण्यात आले.

दरम्यान, उपमुख्यमंत्री शिंदे यांचे हेलिकॉप्टर बापगाव परिसरातील हेलिपॅडवर उतरणार असल्याने तेथे पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मात्र, हवामान बिघडल्याने कार्यक्रम रद्द करण्यात आला आणि बंदोबस्तही हटवण्यात आला. राज्यात गेल्या दोन दिवसांपासून अवकाळी पावसाने हजेरी लावली असून ठाणे, मराठवाडा आणि इतर भागांत वादळी वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळत आहेत.

### सोहराबुद्दीन कथित बनावट चकमक प्रकरण

# सर्व २२ आरोपींची निर्दोष सुटका कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** सोहराबुद्दीन शेख कथित बनावट चकमक प्रकरण प्रकरणातील २१ पोलीस कर्मचाऱ्यांसह सर्व २२ आरोपींची निर्दोष सुटका करण्याचा कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय मुंबई उच्च न्यायालय यांनी कायम ठेवला आहे. मुख्य न्यायमूर्ती आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने या निर्णयाविरोधातील याचिका फेटाळून लावत कनिष्ठ न्यायालयाचा निकाल योग्य ठरवला.

सोहराबुद्दीन शेख यांचे भाऊ रुबाबउद्दीन आणि नायबउद्दीन यांनी विशेष सीबीआय न्यायालयाने २०१८ मध्ये दिलेल्या निकालाला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. आरोपींची निर्दोष मुक्तता रद्द करून प्रकरणाची फेरचाचणी घ्यावी, अशी मागणी याचिकांमधून करण्यात आली होती.

याचिकाकर्त्यांनी दावा केला होता की, हा खटला गंभीर त्रुटींनी ग्रस्त होता आणि त्यामुळे न्यायप्रक्रियेवर परिणाम झाला. महत्त्वाच्या साक्षीदारांनी साक्ष फिरवली असतानाही संबंधित दंडाधिकाऱ्यांना साक्षीसाठी पाचारण करण्यात आले नाही, असा आरोपही करण्यात आला होता. मात्र, उच्च न्यायालयाने पुराव्याअभावी आरोपींना निर्दोष मुक्त करण्याचा कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय योग्य असल्याचे नमूद केले.

वृत्तानुसार, न्यायालयाने म्हटले की, उपलब्ध पुरावे आरोपींविरोधात दोष सिद्ध करण्यासाठी पुरेसे नव्हते. या याचिका २०१९ पासून प्रलंबित होत्या. २०२५ मध्ये न्यायालयाने या प्रकरणाचा निकाल राखून ठेवला होता. सुनावणीदरम्यान सीबीआयनेही कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान न देण्याची भूमिका स्पष्ट केली होती.

प्रकरणानुसार, २३ नोव्हेंबर २००५ रोजी सोहराबुद्दीन शेख, त्यांची पत्नी कौसर बी आणि सहकारी तुलसीराम प्रजापती यांना हैदराबादहून सांगलीकडे जाणाऱ्या लक्झरी बसमधून कथितपणे अपहरण करण्यात आले होते. सीबीआयच्या आरोपानुसार, नंतर सोहराबुद्दीन शेख आणि तुलसीराम प्रजापती यांना बनावट चकमकीत ठार मारण्यात आले, तर कौसर बी यांची हत्या करून मृतदेहाची विल्हेवाट लावण्यात आली. हे प्रकरण सुरुवातीला गुजरातमध्ये दाखल झाले होते. मात्र, २०१२ मध्ये भारताचे सर्वोच्च न्यायालय यांनी निष्पक्ष सुनावणीसाठी खटला मुंबईत वर्ग केला होता.

या प्रकरणात विद्यमान केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्यावरही आरोप ठेवण्यात आले होते. मात्र, २०१४ मध्ये विशेष सीबीआय न्यायालयाचे न्यायमूर्ती एम. बी. गोसावी यांनी पुराव्याअभावी त्यांची प्रकरणातून मुक्तता केली होती.

### तामिळनाडूत सत्तास्थापनेवरून नवा पेच

## राज्यपाल भाजपचे 'एजंट', सिब्बल यांचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपने तीन राज्यांत स्पष्ट बहुमत मिळवत सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा केला आहे. विशेषतः पश्चिम बंगालमध्ये भाजपने २०० हून अधिक जागा जिंकत ऐतिहासिक विजय मिळवला. मात्र, तामिळनाडूत अभिनेता थलपती विजय यांच्या तमिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) पक्षाने पदार्पणातच १०८ जागा जिंकत राज्याच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडवून आणली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही विजय आणि टीव्हीकेचे अभिनंदन केले होते. त्यानंतर विजय आज मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार असल्याची चर्चा होती. मात्र, राज्यपालांनी काही तांत्रिक कारणे पुढे करत अद्याप सत्तास्थापनेसाठी निमंत्रण न दिल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. तामिळनाडू विधानसभेत बहुमतासाठी ११८ आमदारांची आवश्यकता आहे. टीव्हीकेकडे १०८ जागा असून बहुमतासाठी त्यांना आणखी १० आमदारांची गरज आहे. त्यामुळे आता सरकार स्थापनेसाठी कोणत्या पक्षाचा पाठिंबा मिळणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, विजय यांनी गुरुवारी तामिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांची भेट घेऊन सरकार स्थापनेचा दावा सादर केला. शपथविधीनंतर विधानसभेत सहज बहुमत सिद्ध करू, असा विश्वास त्यांनी राज्यपालांना दिला.

याचदरम्यान भाजपने तामिळनाडूच्या राजकारणात सक्रिय हालचाली सुरू केल्याची चर्चा आहे. अखिल भारतीय अण्णा द्रविड मुनेत्र कळघम आणि टीव्हीके यांनी एकत्र येऊन सरकार स्थापन करावे, यासाठी भाजप प्रयत्न करत असल्याचे बोलले जात आहे. तामिळनाडूत काँग्रेसला सत्तेत स्थान मिळू नये, अशी भाजपची रणनीती असल्याचे राजकीय सूत्रांचे म्हणणे आहे.

ज्येष्ठ विधिज्ञ आणि काँग्रेस नेते कपिल सिब्बल यांनी राज्यपालांच्या भूमिकेवर जोरदार टीका केली आहे. त्यांनी तामिळनाडूचे राज्यपाल हे "भाजपचे एजंट" असल्याचा आरोप केला.

"सर्वात मोठ्या पक्षाच्या नेत्याला सरकार स्थापनेसाठी आमंत्रित करणे ही घटनात्मक जबाबदारी आहे. विजय यांना मुख्यमंत्रीपदाची शपथ द्या आणि त्यांना सभागृहात बहुमत सिद्ध करू द्या," असे सिब्बल म्हणाले.

### महाराष्ट्राची भूजल पातळी खालावली

**पुणे :** भयंकर उकाड्याने राज्याची भूजल पातळी दोन मीटरने खोल गेली असून, 75 पेक्षा जास्त तालुके गंभीर झोनमध्ये आहेत. प्रामुख्याने मराठवाड्यातील बीड, जालना, धाराशिव, लातूर, परभणी, नांदेड या जिल्ह्यांतील पाणी पातळी खूप खोल गेल्याने तेथे भूजलाची गंभीर स्थिती आहे. केंद्रीय आणि राज्य भूजल सर्वेक्षण विभागाच्या निरीक्षणानुसार तालुकानिहाय भूजल पातळीचे वर्गीकरण गंभीर (क्रिटिकल), काहीअंशी गंभीर (सेमी क्रिटिकल) आणि अतिशोषित (ओव्हर एक्स्प्लायटेड) गटांत केली आहे. यात मराठवाडा भागातील बीड, जालना, लातूर या जिल्ह्यांची स्थिती सर्वाधिक गंभीर आहे.

## विद्यार्थ्यांची फसवणूक सहन करणार नाही

### संस्थांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचे संरक्षण ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता असून विद्यार्थ्यांची फसवणूक आणि शैक्षणिक नुकसान कोणत्याही परिस्थितीत सहन केले जाणार नाही, असा इशारा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिला आहे. विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या संस्थांवर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

मुंबईतील वांद्रे येथील डॉ. बळीराम हिरे महाविद्यालय येथे विद्यार्थ्यांची फसवणूक झाल्याच्या प्रकरणाची गंभीर दखल घेत चंद्रकांत पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली.

या महाविद्यालयात १३२ हून अधिक विद्यार्थ्यांना बोगस अभ्यासक्रम आणि पदव्यांच्या माध्यमातून फसविण्यात आल्याचे समोर आले आहे. सदर संस्थेत मान्यताप्राप्त वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या नावाखाली विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता नसलेला अभ्यासक्रम सुरू करण्यात आल्याचा आरोप आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित संस्थेविरोधात विद्यापीठ कायद्यानुसार उपलब्ध तरतुदींनुसार कठोर कारवाई करण्याचे निर्देश मंत्री पाटील यांनी दिले.

तसेच विद्यापीठ अनुदान आयोग आणि इतर सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसलेल्या संस्था विद्यार्थ्यांना खोटी आमिषे दाखवून प्रवेश देतात आणि नंतर फसवणूक झाल्याचे समोर येते, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी महाराष्ट्र राज्य कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण क्षेत्रातील अनधिकृत संस्था व अभ्यासक्रम (प्रतिबंध) अधिनियम २०१३ अंतर्गती कारवाई करण्याचे निर्देश दिले.

### ३१० कोटी रुपयांच्या आर्थिक अपहार प्रकरणात कारवाई

# बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक अटकेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बीड :** शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या ३१० कोटी रुपयांच्या आर्थिक अपहार प्रकरणात बीड पोलिसांनी गुरुवारी मोठी कारवाई करत बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना अटक केली आहे. तांत्रिक आणि दस्तऐवजी पुराव्यांच्या आधारे ही कारवाई करण्यात आल्याने जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५४४/२०२५ अंतर्गत भारतीय न्याय संहिता आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात तब्बल ३१० कोटी रुपयांचा अपहार झाल्याचा आरोप असून, आतापर्यंत ७३ कोटी रुपयांचे वाटप झाल्याचे तपासात उघड झाले आहे.

या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथकामार्फत सुरू असून आतापर्यंत १० आरोपींना समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी तीन आरोपींविरोधात न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. तपासादरम्यान पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, व्हिडिओ, ऑडिओ रेकॉर्डिंग, विविध नोंदवही आणि रजिस्टर जप्त केले आहेत. तसेच अटक करण्यात आलेल्या आरोपींच्या मोबाईलमधील कॉल डिटेल रेकॉर्ड, संभाषणांचे तांत्रिक विश्लेषण आणि हस्ताक्षर व स्वाक्षरी नमुन्यांची तज्ज्ञांकडून तपासणी करण्यात आली आहे.

या सर्व पुराव्यांच्या आधारे ७ मे २०२६ रोजी अविनाश पाठक यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली.

अविनाश पाठक यांची दिवसभर कसून चौकशी करण्यात आल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. त्यांना अटक केल्यानंतर बीड न्यायालयात हजर केले जाणार आहे. या कारवाईमुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) सुरू असून आतापर्यंत १० जणांविरोधात शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वी या प्रकरणाचा तपास पोलीस उपाधीक्षक पूजा पवार यांच्याकडे होता. त्यांच्या रजेनंतर तपासाची जबाबदारी एम. व्यंकटराम यांच्याकडे देण्यात आली. पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप आणि प्रभारी पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम यांचे पथक, स्थानिक गुन्हे शाखा आणि उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाच्या पथकाने संयुक्तरीत्या या मोहिमेत सहभाग घेतला. बीड जिल्ह्यातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गासाठी करण्यात आलेल्या भूसंपादन प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या जमिनींच्या मोबदल्यात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांचा वापर करून बनावट आदेश तयार करण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे.

तपासानुसार, बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची २२ एप्रिल २०२५ रोजी बदली झाल्यानंतरही त्यांच्या कार्यकाळातील मागील तारखांचे बनावट आदेश जारी करण्यात आले. या आदेशांच्या आधारे १५४ प्रकरणांमध्ये बनावट स्वाक्षऱ्या आणि जुन्या तारखांचा वापर करून तब्बल २४१ कोटी ६२ लाख रुपयांचा वाढीव मोबदला मंजूर करण्यात आला. यापैकी सुमारे ७३ कोटी ४ लाख रुपये संबंधित खातेदारांना वितरितही करण्यात आल्याचे तपासात उघड झाले आहे. विशेष म्हणजे, या आदेशांबाबत कोणतीही अधिकृत नोंद, रजिस्टर किंवा दस्तऐवज भूसंपादन समन्वय कार्यालयात उपलब्ध नसल्याचे समोर आले आहे. या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर बनावट कागदपत्रांचा वापर झाल्याचा संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे.

## पीएमपीएमएल अध्यक्ष महेश आव्हाड यांच्या कारचा अपघात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** महेश आव्हाड यांच्या कारला मुंबई-पुणे मार्गावर मळवली परिसरात भीषण अपघात झाला. या अपघातात कार चालक आणि बॉडीगार्ड गंभीर जखमी झाले असून महेश आव्हाड यांना किरकोळ दुखापत झाली आहे. सर्व जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, महेश आव्हाड मुंबईहून पुण्याकडे येत होते. मळवली परिसरात त्यांच्या कारसमोर एका मोबाईल मिनी व्हॅनच्या चालकाने अचानक यू-टर्न घेतल्याने हा अपघात घडला. अचानक समोर आलेल्या वाहनामुळे कारवरील नियंत्रण सुटून जोरदार धडक झाली. अपघातात कारचे मोठे नुकसान झाले असून चालक आणि बॉडीगार्ड गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. सुदैवाने महेश आव्हाड थोडक्यात बचावले. घटनेनंतर काही काळ परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली. अपघाताचे नेमके कारण आणि संबंधित मिनी व्हॅन चालकाची भूमिका याचा पुढील तपास सुरू आहे.

या घटनेबाबत महेश आव्हाड यांनी सांगितले की,"मोबाईल मिनी व्हॅनच्या चालकाने अचानक यू-टर्न घेतल्यामुळे हा अपघात झाला. नशीब बलवत्तर म्हणून आम्ही वाचलो. चालक आणि बॉडीगार्ड जखमी झाले असून गाडीचे मोठे नुकसान झाले आहे."

## संपादकीय

## ममतांचा कडवटपणा चालणार नाही...



**पश्चिम बंगालमधील निवडणुकीचे निकाल लागताच पुन्हा एकदा रक्तरंजित तांडव सुरू झाले आहे. ममता बॅनर्जींच्या छत्राखालील ही हिंसा लोकशाहीचा गळा घोटणारी असून, तुष्टीकरणाच्या राजकारणाने बंगालला अराजकतेच्या खाईत लोटले आहे. आता राज्यपालांच्या भूमिकेकडे देशाचे लक्ष लागले असून, हा कडवटपणा बंगालला नक्कीच महागात पडणार आहे.**

पश्चिम बंगाल आणि निवडणूक हिंसाचार हे आता एक दुर्दैवी समीकरण बनले आहे. २०२६ च्या विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होऊन ४८ तास उलटत नाहीत, तोच संपूर्ण बंगालमध्ये पुन्हा एकदा हिंसेचा वणवा पेटला आहे. उत्तर २४ परगणामध्ये भारतीय जनता पक्षाचे नेते शुभेंदु अधिकारी यांच्या वैयक्तिक सहाय्यकावर झालेला गोळीबार, ही केवळ एक घटना नसून ममता बॅनर्जींच्या 'खेला होबे' या हिंसक मानसिकतेचे जिवंत प्रदर्शन आहे. लोकशाहीत जनतेचा कौल शिरसावंद्य मानायचा असतो, मात्र ममता दीदींना केवळ आपली सत्ता आणि आपला वरचष्मा हवा आहे. ज्या राज्यात निवडणुका संपल्यानंतरही विरोधी विचारांच्या कार्यकर्त्यांना जीव मुठीत धरून राहावे लागते, त्या राज्याला 'लोकशाहीचे नंदनवन' म्हणायचे की 'हिंसेचे कुरुक्षेत्र', हा प्रश्न आज संपूर्ण देश विचारत आहे. निवडणुकीच्या निकालानंतर नैतिक जबाबदारी स्वीकारून पायउतार होण्याऐवजी ममता बॅनर्जी यांनी राजीनामा देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. ७ मे रोजी विधानसभा विसर्जित होणार आहे, तरीही सत्तेला चिकटून राहण्याची त्यांची वृत्ती त्यांच्यातील लोकशाहीविरोधी मानसिकतेचे दर्शन घडवते. जनतेने दिलेला कौल जर विरोधात असेल, तर तो नम्रपणे स्वीकारणे हे एका सुसंस्कृत नेत्याचे लक्षण असते. परंतु, ममतांचा 'कडवटपणा' इतका पराकोटीला पोहोचला आहे की, त्यांना संविधानापेक्षा स्वतःची सत्ता मोठी वाटू लागली आहे. बंगालमध्ये सध्या जे काही सुरू आहे, ते केवळ राजकीय संघर्ष नसून संविधानाशी केलेली प्रतारणा आहे. ममता बॅनर्जींच्या राजकारणाचा कणा हा 'तुष्टीकरण' राहिला आहे. एका विशिष्ट मतपेढीला खुश करण्यासाठी त्यांनी बहुसंख्य समाजाच्या भावनांना सातत्याने पायदळी तुडवले आहे. याच तुष्टीकरणामुळे बंगालमध्ये गुन्हेगारांचे मनोबल वाढले असून, त्यांना प्रशासनाचे कोणतेही भय उरलेले नाही. जेव्हा सत्ताधारी पक्ष एका विशिष्ट वर्गाला पाठीशी घालतो, तेव्हा कायदा आणि सुव्यवस्था कागदावरच राहते. आज बंगालमध्ये ज्या पद्धतीने हिंसाचार उफाळला आहे, त्यामागे हेच तुष्टीकरणाचे धोरण कारणीभूत आहे. आपल्या राजकीय फायद्यासाठी एका राज्याला अराजकतेच्या खाईत लोटणे, ही बंगालच्या महान संस्कृतीशी केलेली मोठी गद्दारी आहे. याची मोठी किंमत ममता बॅनर्जींना लवकरच मोजावी लागणार आहे, यात शंका नाही. दिल्लीमध्ये अरविंद केजरीवाल यांनी ज्या पद्धतीने नायब राज्यपालांशी संघर्ष करून आणि प्रशासकीय यंत्रणेला वेठीस धरून अराजकता माजवली होती, त्याच पावलावर पाऊल टाकत ममता बॅनर्जी बंगालमध्ये चालल्याचे दिसते. केंद्र सरकारशी सतत संघर्ष करणे, घटनात्मक पदांचा अपमान करणे आणि तपास यंत्रणांना अडथळे निर्माण करणे, हा एक नवीन प्रकारचा 'अराजकवाद' भारतीय राजकारणात पाय रोवू पाहत आहे. केजरीवाल यांनी दिल्लीत जे केले, त्याचाच अधिक हिंसक अवतार ममता बंगालमध्ये दाखवत आहेत. लोकशाहीच्या नावाखाली सुरू असलेला हा 'हुकूमशाहीचा खेळ' आता थांबवण्याची वेळ आली आहे. अशा परिस्थितीत पश्चिम बंगालच्या राज्यपालांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. जेव्हा राज्य सरकार कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात अपयशी ठरते आणि हिंसाचाराला मूकसंमती देते, तेव्हा राज्यपालांना आपल्या विशेष अधिकारांचा वापर करावा लागतो. बंगालमधील हिंसेचा अहवाल केंद्राला सादर करून, तिथे राष्ट्रपती राजवट लावण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे का, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. बंगालच्या जनतेला हिंसाचाराच्या आगीत होरपळताना केंद्र सरकार आणि राज्यपाल उघड्या डोळ्यांनी पाहू शकत नाहीत. ममता बॅनर्जी यांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, सत्ता येते आणि जाते, पण लोकशाही टिकणे महत्त्वाचे आहे. बंगालच्या मातीला क्रांतिकारकांचा आणि विचारवंतांचा वारसा आहे, तो रक्तरंजित हिंसेचा नाही. तुमचा कडवटपणा आणि सत्तेची हव्यास बंगालला उद्ध्वस्त करत आहे. हा हिंसाचार तातडीने थांबला नाही, तर इतिहास तुम्हाला कधीही माफ करणार नाही. बंगालची जनता आता या दहशतीला कंटाळली असून, परिवर्तनाची लाट या कडवट सत्तेला मुळासकट उखडून टाकल्याशिवाय शांत बसणार नाही. आता वेळ आली आहे की, संविधानाने आपला इंगा दाखवून बंगालमध्ये शांतता प्रस्थापित करावी.

# ईशान्येचा जागरूक पहारा आणि आसामचा विजय

**» आसाममधील भाजपा विजय हा संपूर्ण ईशान्य भारताच्या राजकीय-सांस्कृतिक पुनरुत्थानाचा हुंकार आहे. फुटीरतावाद आणि घुसखोरीला मूठमाती देत विकासाच्या 'अष्टलक्ष्मी' संकल्पनेचा हा झालेला ऐतिहासिक विजय आहे.**



आसाममधील विधानसभा निवडणुकीचे निकाल हे केवळ सत्तांतराचे आकडे नाहीत, तर ते एका महाप्रचंड वैचारिक स्थित्यंतराचे द्योतक आहेत. अनेक दशके 'दिल्लीपासून दूर' आणि मानसिकदृष्ट्या दुर्लक्षित राहिलेला ईशान्य भारत आज मुख्य प्रवाहातील राजकारणाचे केंद्र बनला आहे. हा विजय म्हणजे केवळ मतांची बेरीज-वजाबाकी नसून, आसामच्या अस्मितेने 'आक्रमक' घुसखोरी आणि 'उदासीन' राजकारणाविरुद्ध पुकारलेले हे एक निर्णायक युद्ध होते. आसाम हे ईशान्येचे प्रवेशद्वार आहे. जर या प्रवेशद्वारावर राष्ट्रवादाचा नंदादीप तेवत असेल, तर त्याचे तेज संपूर्ण सात राज्यांच्या कानाकोपऱ्यात पोहोचणे अटळ आहे. आसामने दिलेला हा कौल 'विभाजनाच्या' राजकारणाला गाडून 'विस्ताराच्या' प्रक्रियेला स्वीकारणारा आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ईशान्य भारताला 'अष्टलक्ष्मी' संबोधून तिथल्या विकासाला जे प्राधान्य दिले, त्याचे फलित आज जमिनीवर दिसत आहे. ब्रह्मपुत्रेवर बांधलेले महाकाय पूल केवळ दोन किनाऱ्यांना जोडत नाहीत, तर ते इथल्या जनसामान्यांच्या आकांक्षांना भारताच्या मुख्य भूमीशी आणि राजधानीशी जोडत आहेत. रस्ते, पूल, इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि आरोग्य सुविधांचा जो झंझावात गेल्या काही वर्षांत आसामने अनुभवला, तो यापूर्वीच्या 'व्होट बँक' केंद्रित काँग्रेस राजवटीत निव्वळ अशक्य होता. जेव्हा विकास शेवटच्या माणसापर्यंत पोहोचतो, तेव्हा फुटीरतावादी शक्तींचे आणि परकीय चिथावणीचे आपोआप खच्चीकरण होते. आसामचा हा निकाल हेच अधोरेखित करतो की, इथल्या तरुण पिढीला आता बंदुका आणि आंदोलने नकोत, तर प्रगतीचे महामार्ग आणि सन्मानाचे जीवन हवे आहे.

आसामच्या राजकारणात 'डेमोग्राफी' (लोकसंख्याशास्त्र) हा नेहमीच चिंतेचा विषय राहिला आहे. बेकायदेशीर घुसखोरीमुळे बदलणारे लोकसंख्येचे प्रमाण हे केवळ राजकीय संकट नसून ते इथल्या प्राचीन संस्कृतीवर झालेले आक्रमण होते. आसाममधील हा विजय म्हणजे तिथल्या पवित्र 'सत्रांच्या' आणि स्वदेशी परंपरांच्या रक्षणाचा विजय आहे. आपल्या 'माती' आणि 'माणसांशी' प्रतारणा करणाऱ्या शक्तींना मतदारांनी घरचा रस्ता दाखवला आहे. एनआरसी आणि सीएएच्या संदर्भात विरोधकांनी जाणीवपूर्वक पसरवलेले भ्रम आणि भीतीचे वातावरण आसामच्या सुज्ञ जनतेने धुडकावून लावले आहे. आपल्या अस्तित्वाची आणि सांस्कृतिक वारशाची लढाई लोकशाहीच्या मार्गाने कशी जिंकायची, याचा वस्तुपाठच आसामने देशासमोर ठेवला आहे.

आसाममधील भाजपचा विजय संपूर्ण ईशान्येसाठी एक संरक्षक कवच ठरणार आहे. 'चिकन नेक' या संवेदनशील भागाची सुरक्षा असो किंवा शेजारील देशांच्या सीमांवरील हालचाली, आसाममध्ये राष्ट्रवादी विचारांचे सरकार असणे हे भारताच्या अंतर्गत सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. मणिपूर, मेघालय आणि नागालँड या राज्यांमध्येही या विजयाचे सकारात्मक पडसाद उमटणार आहेत. केंद्र सरकारने केलेले विविध शांतता करार आणि बंडखोर गटांना मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न, यावर आसामच्या जनतेने 'लोकशाही शिक्कामोर्तब' केले आहे. आता ईशान्य भारत हा 'अस्वस्थतेचा प्रदेश' न राहता 'संधींचा प्रदेश' म्हणून जागतिक नकाशावर उभा राहत आहे.

ज्याप्रमाणे लचित बोरफुकन यांनी सराईघाटच्या युद्धात परकीय आक्रमकांना रोखले होते, त्याच धडाडीने हिमंता बिस्वा सरमा यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आसामच्या हिताचे रक्षण केले आहे. प्रशासकीय पकड, धाडसी निर्णय आणि स्पष्टवक्तेपणा यामुळे त्यांनी जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण केले. विरोधकांनी जात, धर्म आणि संकुचित प्रादेशिकतावादाचे जुनेच पत्ते खेळून पाहिले, मात्र 'सबका साथ, सबका विकास' या मंत्रापुढे त्यांची सर्व गणिते भुईसपाट झाली. हा विजय म्हणजे खऱ्या अर्थाने 'असमिया' अस्मितेचा भारतीयत्वाशी झालेला सुंदर संगम आहे.

आसामचा हा विजय म्हणजे ईशान्येच्या राजकारणातील एका अंधाऱ्या युगाचा अंत आणि एका सुवर्णयुगाचा प्रारंभ आहे. हा केवळ राजकीय विजय नाही, तर ही एक सांस्कृतिक क्रांती आहे. या विजयामुळे सीमा अधिक सुरक्षित झाल्या आहेत आणि इथल्या जनतेच्या मनात भारताप्रती असलेली निष्ठा अधिक पोलादी झाली आहे. ईशान्येचा हा 'जागरूक पहारा' येणाऱ्या काळात देशाच्या अखंडतेचा सर्वात मोठा आधारस्तंभ ठरणार आहे.

# सफाई कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवणे ही प्रशासनाची जबाबदारी

## राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी :** शहराची स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्य टिकवून ठेवण्यात सफाई कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, त्यांच्या समस्या केवळ नोंदवून न ठेवता त्या तातडीने आणि संवेदनशीलतेने सोडवणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकाच्या मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्या व प्रश्नांबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीच्या प्रारंभी महापौर रवि लांडगे यांनी शेरसिंग डागोर यांचे स्वागत केले.

या बैठकीस आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, सह आयुक्त मनोज लोणकर, सह शहर अभियंता प्रेरणा सिनकर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, संदीप खोत, अण्णा बोदडे, पंकज पाटील, अतुल पाटील, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, अश्विनी गायकवाड, पूजा दूधनाळे, निवेदिता घार्गे, कार्यकारी अभियंता राजेंद्र जावळे, राजेंद्र शिंदे, जाहिरा मोमीन, महेश बरीदे, विनय ओहोळ, सोहन निकम, मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, आरोग्य निरीक्षक तसेच सफाई कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी महापालिकेकडून सफाई कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजना प्रभावीपणे राबवल्या जात असल्याचे सांगितले. प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासनाने गतीने काम सुरू केले असून, तांत्रिक किंवा प्रक्रियात्मक अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीदरम्यान सफाई कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी विविध समस्या मांडल्या. त्यानंतर शेरसिंग डागोर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना त्या तातडीने सोडवण्याचे निर्देश दिले. बैठकीच्या शेवटी त्यांच्या हस्ते काही कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले तसेच पुढील सेवेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## चार महत्त्वाचे ठराव मंजूर

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** महापालिकेच्या क्रीडा, कला व साहित्य समितीची आढावा बैठक सभापती कैलास कुटे यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात पार पडली. या बैठकीत शहरातील क्रीडा, कला व साहित्य क्षेत्राच्या विकासासाठी चार महत्त्वाच्या प्रस्तावांना मान्यता देण्यात आली.

या बैठकीस विरोधी पक्षनेते तथा समिती सदस्य भाऊसाहेब भोईर, शाम जगताप, धर्मपाल तंतरपाळे, तानाजी बारणे, योगेश लांडगे, जितेंद्र ननावरे, उपआयुक्त पंकज पाटील आणि जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक उपस्थित होते.

बैठकीत नागरिक, खेळाडू, कलाकार आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी लोकाभिमुख प्रस्ताव सादर करण्यात आले. सभापती कैलास कुटे यांच्या पुढाकारातून मांडण्यात आलेल्या प्रस्तावांमध्ये शहरातील विविध भागांत 'कला केंद्र' सुरू करून नवोदित कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, महापालिकेच्या क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी खेळाडूंना अपघाती विमा संरक्षण देणे, महिलांसाठी जलतरण तलाव, व्यायामशाळा व इतर क्रीडा सुविधांमध्ये विशेष सवलती व स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच क्रीडा विभागाचे 'क्रीडा, कला, साहित्य, पर्यटन व सांस्कृतिक विभाग' असे नामकरण करणे या महत्त्वाच्या निर्णयांचा समावेश आहे.

## विरोधी पक्ष ही भाजपची बी टीम : चेतन पवार

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत विरोधी पक्ष सक्षम भूमिका घेत नसून, राज्यात भाजपसोबत सत्तेत सहभागी असलेला विरोधी पक्ष हा प्रत्यक्षात भाजपचीच "बी टीम" असल्याची टीका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नवनियुक्त शहराध्यक्ष चेतन पवार यांनी केली.

पिंपरी येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी उपजिल्हाप्रमुख रोमी संधू, शहर समन्वयक कैलास नेवासकर, पिंपरी विधानसभा प्रमुख तुषार नवले, उपशहर प्रमुख अमोल निकम, शहर कार्यालय सचिव ज्ञानेश्वर शिंदे, उपशहर प्रमुख राजाराम कुदळे, पार्थ गुरव, बाळासाहेब जम, जिल्हा संघटिका अनिता तुतारे, उपजिल्हा संघटिका वैभवी घोडके, कल्पना शेटे, विभाग संघटिका बेबी सय्यद आदी उपस्थित होते. पत्रकार परिषदपूर्वी शहर शिवसेनेच्या वतीने चेतन पवार यांच्या नेतृत्वाखाली पिंपरीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक येथे नसरापूर आणि सहकारनगर येथील अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटनेचा निषेध करण्यात आला. तसेच या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. भाजप आमदार चित्रा वाघ यांनी केलेल्या वक्तव्याचाही निषेध करण्यात आला.

आगामी काळात पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघातील जुन्या-नव्या शिवसैनिकांना एकत्र घेऊन नवीन शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार असून, त्यामध्ये समाजातील सर्व घटकांना प्रतिनिधित्व दिले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला कर्जबाजारी करणाऱ्या तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांच्या कारभाराची तसेच नुकत्याच समोर आलेल्या ५२ कोटी रुपयांच्या कथित भ्रष्टाचार प्रकरणाची माहिती घेऊन न्यायालयात दाद मागितली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

# ऑनलाइन केक ऑर्डरच्या बहाण्याने सायबर फसवणूक

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**




**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड परिसरात ऑनलाइन ऑर्डरच्या माध्यमातून फसवणुकीचे प्रकार पुन्हा समोर आले असून, हिंजवडी परिसरात एका महिलेची तब्बल १ लाख ३१ हजार रुपयांची सायबर फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना ३१ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ४.३७ ते ६.३० वाजण्याच्या दरम्यान हिंजवडी फेज-३ येथील मेगा पॉलिस सोसायटी परिसरात घडली. संबंधित महिलेने आपल्या पतीच्या वाढदिवसानिमित्त ऑनलाइन केक ऑर्डर केला होता. मात्र, केक वेळेत न आल्याने त्यांनी कस्टमर केअरशी संपर्क साधला. यावेळी ९३३०२९७८११ या मोबाईल क्रमांकावरून अज्ञात व्यक्तीने संपर्क साधत "रिफंड प्रक्रिया सुरू आहे" असा संदेश पाठवला. त्यानंतर आरोपींनी महिलेचा विश्वास संपादन करून तिच्या मोबाईलवर नियंत्रण मिळवले आणि बँक खात्यांची माहिती हस्तगत केली. यानंतर आरोपींनी महिलेच्या ॲक्सिस बँक आणि आयसीआयसीआय बँक खात्यांमधून एकूण १ लाख ३१ हजार रुपये काढून घेत फसवणूक केली.

या प्रकरणी हिंजवडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ मधील कलम ६६(ड) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पाटील करत आहेत. पोलिसांनी नागरिकांना ऑनलाइन ऑर्डर किंवा रिफंडच्या नावाखाली येणाऱ्या अनोळखी कॉल्स आणि लिंकपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे. कोणालाही मोबाईल स्क्रीन शेअरिंग, ओटीपी किंवा बँकिंग माहिती देऊ नये, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### एटीएम कार्ड अपडेटच्या बहाण्याने फसवणूक

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवडमधील भोसरी एमआयडीसी परिसरात एटीएम आणि क्रेडिट कार्ड अपडेटच्या बहाण्याने एका नागरिकाची तब्बल १ लाख ९० हजार ४६६ रुपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २० फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी या कालावधीत एका अज्ञात महिलेने फिर्यादीशी मोबाईलवर संपर्क साधला. संबंधित महिलेने स्वतःला बँकेची प्रतिनिधी असल्याचे सांगत "क्रेडिट कार्ड प्रोटेक्शन प्लॅन अपडेट" करण्याचा बहाणा केला. यानंतर आरोपी महिलेने फिर्यादीला व्हॉट्सअॅपद्वारे एक लिंक पाठवून मोबाईल अॅप अपडेट करण्यास सांगितले. फिर्यादीने विश्वास ठेवून संबंधित लिंक ओपन केली. त्यानंतर त्यांच्या बँक खात्याशी संबंधित माहिती हॅक करण्यात आली. आरोपींनी फिर्यादीच्या क्रेडिट कार्डवरून एकूण १ लाख ९० हजार ४६६ रुपये डेबिट करून फसवणूक केली. घटनेनंतर ५ मे रोजी रात्री या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(सी) आणि ६६(डी) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. अज्ञात आरोपी महिलेचा शोध सुरू असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. अनोळखी व्यक्तींनी पाठवलेल्या लिंकवर क्लिक करू नये, व्हॉट्सअॅपवर वैयक्तिक किंवा बँकिंग माहिती शेअर करू नये, तसेच "केवायसी अपडेट", "कार्ड अपडेट" किंवा "प्रोटेक्शन प्लॅन" अशा नावाखाली येणाऱ्या कॉल्सपासून सावध राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### जुन्या वादातून हल्ला

**मावळ :** मावळ तालुक्यातील शिरगाव परिसरात जमिनीच्या जुन्या वादातून एका कुटुंबावर हल्ला झाल्याची घटना घडली असून, या प्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना ४ मे २०२६ रोजी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास बेबड ओव्हाळ (ता. मावळ, जि. पुणे) येथे घडली. याप्रकरणी दत्तात्रय भिकाजी सावंत (वय ५७, व्यवसाय – शेती) यांनी फिर्याद दिली आहे.

## फुटपाथवरील वादातून महिलेला मारहाण

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवडमधील चिंचवड परिसरात फुटपाथवरील किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका महिलेला मारहाण करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी निगडी पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना ४ मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास चिंचवड स्टेशन परिसरातील फुटपाथवर घडली. फिर्यादी महिला या फुटपाथवर मासे विक्री करत असताना शेजारील टपरीवर काम करणाऱ्या व्यक्तींशी किरकोळ कारणावरून वाद झाला. वादाचे रूपांतर पुढे मारहाणीत झाले. आरोपींनी फिर्यादी महिलेला शिवीगाळ करून ढकलाढकली केली. तसेच एका आरोपीने लोखंडी रॉडने तिच्या उजव्या हातावर आणि डोक्यावर वार करून तिला जखमी केल्याची तक्रार पोलिसांकडे नोंदविण्यात आली आहे. या प्रकरणी संदीप चाफळकर (वय ४५), एक महिला आरोपी आणि लकी ऊर्फ सोन्या चाफळकर (वय १९, सर्व रा. जाधववाडी, मोशी, पुणे) यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अद्याप आरोपींना अटक करण्यात आलेली नसून निगडी पोलीस पुढील तपास करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### लाच घेताना हवालदार रंगेहाथ पकडला


**पुणे** : लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) पुण्यात मोठी कारवाई करत कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यातील एका पोलीस हवालदाराला दीड लाख रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक केली. कारवाईदरम्यान आरोपीने तक्रारदाराच्या छातीवर चावा घेत अधिकाऱ्यांना धक्काबुक्की करत पळून जाण्याचा प्रयत्न केल्याने परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. अटक करण्यात आलेल्या पोलीस हवालदाराचे नाव गणेश शहाजी कसपटे (वय ४०) असून तो फुरसुंगी येथील शंकर सुमन हाइट्समध्ये वास्तव्यास आहे. याप्रकरणी एका ५२ वर्षीय व्यक्तीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या मालकाविरुद्ध हैदराबाद न्यायालयात धनादेश अनादर प्रकरणी गुन्हा दाखल असून त्यामध्ये अटक वॉरंट जारी करण्यात आले होते. हे वॉरंट बजावू नये आणि संबंधित व्यक्तीला अटक होऊ नये यासाठी आरोपी कसपटे याने यापूर्वीच पाच लाख रुपये घेतल्याचा आरोप आहे. यानंतर १ मे रोजी आरोपीने पुन्हा तक्रारदाराच्या मालकाला अटक न करण्यासाठी अडीच लाख रुपयांची मागणी केली. तडजोडीनंतर ही रक्कम दोन लाख रुपयांवर निश्चित करण्यात आली. याबाबत तक्रारदाराने ५ मे रोजी एसीबीकडे अधिकृत तक्रार दाखल केली. तक्रारीची पडताळणी करताना आरोपीने दीड लाख रुपये स्वीकारण्यास तयारी दर्शवली. त्यानुसार ६ मे रोजी दुपारी बोटक्लब रोडवरील सुलक्स कल्पतरू गार्डन सोसायटीसमोर एसीबीने सापळा रचला. बुधवारी दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास गणेश कसपटे याने तक्रारदाराकडून दीड लाख रुपयांची लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्याला रंगेहाथ पकडले. मात्र, त्यावेळी आरोपीने तक्रारदाराच्या छातीवर चावा घेतला तसेच अधिकाऱ्यांना धक्काबुक्की करत पळून जाण्याचा प्रयत्न केला. अखेरीस पथकाने त्याला ताब्यात घेतले.

### मंदिर विकासाची कामे अंतिम टप्प्यात

# श्री भीमाशंकर मंदिर 31 मे पासून खुले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराचे दरवाजे येत्या ३१ मेपासून भाविकांसाठी पुन्हा खुले करण्यात येणार आहेत. मंदिराच्या मुख्य सभामंडपाच्या पुनर्बांधणीसह सुरक्षा आणि सुविधा विकासकामांमुळे गेल्या साडेतीन महिन्यांपासून भाविकांना गाभाऱ्यात प्रवेश बंद करण्यात आला होता. आता ही सर्व कामे अंतिम टप्प्यात पोहोचली असून जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी यासंदर्भातील माहिती दिली आहे.



तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत भीमाशंकर मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर सुधारणा करण्यात येत आहेत. विशेषतः भाविकांची सुरक्षा, गर्दी नियंत्रण आणि दर्शन व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यावर प्रशासनाने भर दिला आहे. जानेवारी महिन्यात सुरू झालेली ही कामे सुरुवातीला तीन महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन होते. मात्र कामाची व्याप्ती वाढल्याने आणि गुणवत्तेला प्राधान्य देण्यात आल्याने मुदत ३१ मेपर्यंत वाढवण्यात आली होती. २०२७ मध्ये नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर येथे भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन मंदिर परिसरातील सुविधा अधिक आधुनिक आणि सुरक्षित करण्यात येत आहेत. नव्या सभामंडपामुळे भाविकांना रांगेत उभे राहताना होणारा त्रास कमी होणार असून दर्शन प्रक्रिया अधिक सुकर, जलद आणि सुरक्षित होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. प्रशासनाने नुकताच विकासकामांचा आढावा घेतला असून, उर्वरित कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. ३१ मे रोजी मंदिर पुन्हा भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज असेल.

## मोटारसायकलस्वारावर बिबट्याने केला हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर** : आंबेगाव तालुक्यातील रानमळा येथे बिबट्याने रस्त्यावरून जाणाऱ्या मोटारसायकलवर झेप घेतल्याने एक युवक जखमी झाल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात प्रशांत अरूण रोकडे (वय ३४, रा. लोणी, ता. आंबेगाव) यांच्या डाव्या पायाला दुखापत झाली असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास अक्षय अरूण रोकडे आणि प्रशांत अरूण रोकडे हे दोघे भाऊ मोटारसायकलवरून लाईट फिटिंगच्या कामासाठी लोणी येथून पोखरकरमळा येथे जात होते. रानमळा गावाच्या हद्दीतील भामची विहीर परिसरात त्यांची मोटारसायकल पोहोचताच रस्त्याच्या कडेला दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक झेप घेतली. या वेळी मोटारसायकलच्या मागे बसलेल्या प्रशांत रोकडे यांच्यावर बिबट्याने हल्ला करत त्यांच्या डाव्या पायाला जखमी केले. अचानक झालेल्या या प्रकारामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले. ग्रामस्थ आणि वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत जखमी प्रशांत रोकडे यांना मंचर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. उपचारानंतर त्यांना घरी सोडण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

दरम्यान, बिबट्याचा वावर लक्षात घेता वनविभागाने तत्काळ उपाययोजना सुरू केल्या आहेत. बिबट्याला पकडण्यासाठी हल्ला झालेल्या ठिकाणी बुधवारी सकाळी पिंजरा लावण्यात आल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी दिली. ग्रामस्थांनी रात्रीच्या वेळी एकटे प्रवास टाळावा आणि सतर्क राहावे, असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.

## अर्धवट रस्त्याच्या कामामुळे ग्रामस्थ त्रस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपळवंडी** : जुन्नर तालुक्यातील चौदानंबर येथील पुणे-नाशिक महामार्गावरील उड्डाणपुलाखाली सुरू असलेल्या अर्धवट रस्त्याच्या कामामुळे ग्रामस्थ आणि व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणावर धुळीच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. हे काम तात्काळ पूर्ण न झाल्यास ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा माजी सरपंच नारायण भोर आणि अनिल बापू भोर यांनी दिला आहे.



सध्या पुणे-नाशिक महामार्गाचे सिमेंट रस्त्याचे काम सुरू आहे. चौदानंबर येथे महामार्गावर उड्डाणपूल असून पुलाच्या बाजूने सेवा रस्ता तयार करण्यात आला आहे. उड्डाणपुलाच्या प्रवेशद्वाराजवळ पाणी साचत असल्यामुळे सुमारे दीड ते दोन महिन्यांपूर्वी या ठिकाणचे डांबरीकरण काढण्यात आले होते. मात्र त्यानंतर काम रखडल्याने परिसरात मोठ्या प्रमाणावर धूळ उडत असून ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून येथील व्यावसायिक आणि नागरिकांना धुळीचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. काही व्यवसाय पूर्णपणे बंद पडले असून काही व्यवसाय बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे स्थानिकांनी सांगितले. खोदकामामुळे रस्त्यावर खड्डे आणि खटके निर्माण झाले असून या ठिकाणी एका दुचाकीस्वाराचा अपघात झाल्याची माहितीही ग्रामस्थांनी दिली.

या समस्येबाबत ग्रामस्थांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तात्पुरत्या स्वरूपात डांबर टाकावे किंवा जुन्या रस्त्यावरील खरडून काढलेले डांबर टाकून धुळीचा त्रास कमी करावा, अशी मागणी केली होती. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांकडून "डांबर शिल्लक नाही" अशी कारणे देत उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. अर्धवट रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा नारायण भोर आणि अनिल बापू भोर यांनी दिला आहे.

## आंबेगाव तालुक्यात उष्णतेचा कहर

### नागरिकांचा झाडांच्या सावलीकडे वाढला ओढा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : आंबेगाव तालुक्यात यंदाच्या उन्हाळ्यात उष्णतेने अक्षरशः कहर केला असून नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. सकाळी दहा वाजताच उन्हाचा तडाखा असह्य होऊ लागल्याने नागरिक झाडांच्या सावलीचा आधार घेताना दिसत आहेत. गेल्या दोन महिन्यांपासून सातत्याने वाढत असलेल्या तापमानामुळे शेती कामांवरही विपरीत परिणाम होत आहे.



तालुक्याच्या पूर्व भागात दुपारच्या वेळी प्रचंड उकाडा जाणवत असून अनेक ठिकाणी रस्ते निर्मनुष्य दिसू लागले आहेत. सकाळी नऊ वाजल्यापासूनच उन्हाची तीव्रता वाढत असल्याने नागरिकांना घराबाहेर पडणे कठीण होत आहे. दुपारच्या वेळेत अंगाची अक्षरशः लाही-लाही होत असल्याने अनेकजण कामे थांबवून विश्रांती घेण्यास प्राधान्य देत आहेत.

उष्णतेचा सर्वाधिक फटका शेतकरी आणि शेतमजुरांना बसत आहे. कांदा काढणी, कांदा भरणी तसेच इतर शेती कामे सुरू असताना कडक उन्हामुळे शेतमजूर कामावर येण्यास टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर मजुरांची टंचाई निर्माण झाली आहे. मात्र, अशा कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांनी उपलब्ध मजुरांच्या मदतीने कांदा काढणी आणि भरणीची कामे वेगाने पूर्ण करण्यावर भर दिला आहे.

दरम्यान, परिसरात लग्नसराईचाही हंगाम सुरू असल्याने वऱ्हाडी मंडळींची उष्णतेमुळे चांगलीच दमछाक होत आहे. विवाह सोहळ्यांसाठी आलेल्या पाहुण्यांना उन्हाचा मोठा त्रास सहन करावा लागत असून थंड पाणी, शीतपेये आणि सावलीच्या ठिकाणांना मोठी मागणी वाढली आहे. गेल्या आठवड्यापासून तालुक्यातील अनेक गावांमध्ये सकाळी दहा वाजल्यापासूनच नागरिक झाडांच्या सावलीखाली थांबत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. बाजारपेठा, चौक आणि बसथांबे येथेही नागरिक उन्हापासून बचाव करण्यासाठी सावलीचा आधार घेताना दिसत आहेत. यंदाचा उन्हाळा अत्यंत तीव्र असल्याची भावना नागरिक व्यक्त करत असून पुढील काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे नागरिकांनी दुपारच्या वेळेत अनावश्यक बाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी प्यावे आणि उष्माघातापासून बचावासाठी आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

## जय पवार यांचाही जनता दरबार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवानेते श्री जयदादा अजितदादा पवार यांनी बारामती येथे नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्याच्या उद्देशाने जनता दरबाराची सुरुवात केली. पहिल्याच जनता दरबाराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. विविध भागांतून आलेल्या नागरिकांनी पाणी, रस्ते, वीज, महसूल, आरोग्य, शैक्षणिक तसेच स्थानिक प्रशासनाशी संबंधित समस्या जय पवार यांच्यासमोर मांडल्या.



जनतेच्या अडचणी समजून घेत जय अजितदादा पवार यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी तात्काळ दूरध्वनीवरून संपर्क साधत अनेक प्रश्न जागेवरच मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या समजून घेण्यावर आणि त्वरित निराकरण करण्यावर त्यांनी विशेष भर दिला. यावेळी अनेक नागरिकांनी आपल्या प्रश्नांना तत्काळ प्रतिसाद मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले. स्थानिक पातळीवरील प्रशासकीय अडचणी, प्रलंबित कामे आणि शासकीय योजनांबाबतही नागरिकांनी आपली मते मांडली.

नागरिकांच्या समस्या जलदगतीने सोडवण्यासाठी दर आठवड्याच्या प्रत्येक गुरुवारी जनता दरबार आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती जय अजितदादा पवार यांनी दिली. या माध्यमातून नागरिकांना थेट भेटून त्यांच्या समस्या जाणून घेऊन प्रशासनाशी समन्वय साधत त्या सोडवण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पहिल्याच जनता दरबाराला मिळालेल्या मोठ्या प्रतिसादामुळे बारामती परिसरात या उपक्रमाची चर्चा सुरू असून नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत केले आहे.

## चऱ्होली खुर्द येथे पाईपच्या गोडाऊनला भीषण आग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी** : चऱ्होली खुर्द परिसरातील आळंदी-वडगाव रस्त्यावर साई गार्डन मंगल कार्यालयाच्या दक्षिणेला असलेल्या पाईप कंपनीच्या गोडाऊनला बुधवारी दुपारी भीषण आग लागल्याची घटना घडली. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या आगीत कंपनीचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास गोडाऊनमधून धुराचे मोठे लोट बाहेर येऊ लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण करत गोडाऊनमधील पाईप साहित्याला वेढा घातला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, ग्रामस्थ आणि पोलिस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. आगीची माहिती तत्काळ अग्निशमन विभागाला देण्यात आली. त्यानंतर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा अग्निशमन विभाग, पीएमआरडीए अग्निशमन विभाग तसेच चाकण नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी दाखल होत आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. सुमारे अडीच तासांच्या अथक प्रयत्नांनंतर सायंकाळी साडेपाचच्या सुमारास आग पूर्णपणे आटोक्यात आणण्यात जवानांना यश आले.

आगीमुळे संपूर्ण परिसर धुराने व्यापला गेला होता. गोडाऊनमधील मोठ्या प्रमाणातील साहित्य जळून खाक झाले असून कंपनीचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र, वेळेवर मदतकार्य झाल्याने कोणतीही जीवितहानी टळली.

## कांदा दर घसरल्याने शेतकरी संकटात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिरूर** : कांद्याला मिळत असलेल्या अल्प बाजारभावामुळे शिरूर तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. उत्पादन खर्च सातत्याने वाढत असताना बाजारात कांद्याला अत्यल्प दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे.



तालुक्यात उसाबरोबरच कांद्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. मात्र कांद्याची लागवड करताना शेतकऱ्यांना मोठा खर्च करावा लागतो. शेताची नांगरट, मशागत, लागवड, खुरपणी, खतांचा वापर, पाणीपुरवठा तसेच कांदा काढणीपर्यंत विविध टप्प्यांवर मोठ्या प्रमाणात खर्च होत आहे. दिवसेंदिवस वाढणाऱ्या मजुरी आणि शेती साहित्याच्या दरामुळे उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे.

यंदा तीव्र उष्णतेमुळे विहिरी आणि विंधन विहिरींनी तळ गाठला आहे. अनेक भागांत पाणीटंचाई निर्माण झाल्याने कांदा पिकाला पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. परिणामी कांद्याच्या उत्पादनात घट झाली आहे. कमी उत्पादन आणि कमी बाजारभाव या दुहेरी संकटामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.

कांदा काढणीसाठी मजूर मिळणेही कठीण झाले आहे. उष्णतेच्या तीव्रतेमुळे मजूर सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंतच काम करत आहेत. एका मजुराला दिवसाला ३०० ते ४०० रुपये मजुरी द्यावी लागत असूनही मजुरांची कमतरता भासत आहे. त्यामुळे कांदा काढणीची कामे रखडत आहेत. सध्या बाजारात कांद्याला प्रतिकिलो केवळ ८ ते १२ रुपये दर मिळत आहे. हा दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. अनेक शेतकऱ्यांचा लागवडीचा खर्चही निघत नसल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

सध्याच्या बाजारभावात कांद्याचा उत्पादन खर्चही निघत नाही. सरकारने कांद्याला हमीभाव द्यावा, अशी मागणी कांदा उत्पादक शेतकरी करत आहेत.

### आळंदी देवस्थानची भूमिका ठाम

# पुण्यातील मुक्कामाबाबत लेखी हमीशिवाय निर्णय नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी** : श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिर येथून निघणाऱ्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या पुण्यातील मुक्कामाबाबत अद्याप अंतिम निर्णय झालेला नसून, आवश्यक सुविधा आणि नियोजनाबाबत प्रशासनाकडून लेखी हमी मिळाल्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाईल, अशी स्पष्ट भूमिका आळंदी देवस्थानकडून मांडण्यात आली आहे.



पालखी सोहळ्यादरम्यान पुण्यातील भवानी पेठ परिसरात होणाऱ्या पारंपरिक मुक्कामाच्या ठिकाणी जागेची कमतरता, वाहनतळाची अपुरी व्यवस्था, स्वच्छतागृहांची अडचण, पिण्याच्या पाण्याची अपुरी सुविधा तसेच वाहतूक कोंडी यांसारख्या समस्या वारंवार समोर येत आहेत. यामुळे वारकरी आणि भाविकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याची भावना देवस्थान आणि दिंडी प्रतिनिधींनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर आळंदी देवस्थान, पालखी सोहळा प्रमुख आणि दिंडी समाज संघटनांच्या प्रतिनिधींमध्ये महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत पुण्यातील मुक्कामासाठी पर्यायी ठिकाणाचा पर्यायही चर्चेत आला. मात्र, प्रशासनाने आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत स्पष्ट आणि लेखी आश्वासन दिल्यास पारंपरिक मुक्काम कायम ठेवण्यास प्राधान्य दिले जाईल, असे संकेत देण्यात आले आहेत. पालखी सोहळ्यात दरवर्षी लाखो वारकरी सहभागी होत असल्याने नियोजन अधिक सक्षम आणि आधुनिक पद्धतीने करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. विशेषतः गर्दी नियंत्रण, आरोग्य सुविधा, पाणीपुरवठा, वाहतूक व्यवस्थापन आणि सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने वेळेत उपाययोजना कराव्यात, अशी मागणी देवस्थानकडून करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनानेही पालखी मार्गावरील विकासकामे आणि सोयीसुविधा वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित विभागांना दिले असून, वारकऱ्यांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी व्यापक नियोजन सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

## वाडी-वस्तीवर पोहोचला सौर पथदिव्यांचा उजेड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी** : उर्मी संस्थेच्या माध्यमातून खेड आणि मावळ तालुक्यातील वाडी-वस्त्यांवर साक्षरता वर्ग चालवले जात आहेत. हे वर्ग प्रामुख्याने रात्रीच्या वेळेत भरत असल्याने अनेक ठिकाणी विजेच्या अपुऱ्या सुविधांमुळे ग्रामस्थांना अडचणींचा सामना करावा लागत होता. पुरेसा उजेड नसल्याने महिला, विद्यार्थी आणि नागरिकांना ये-जा करताना गैरसोय होत होती.

ही समस्या लक्षात घेऊन उर्मी संस्थेने स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने सौर पथदिवे बसविण्याचा उपक्रम राबविला. खेड तालुक्यातील कोये आणि कुरकुंडी गावांतील ठाकर वस्तीवर संस्थेच्या वतीने सौर दिवे उपलब्ध करून देण्यात आले. ग्रामस्थांनीही पुढाकार घेत खांब उभारून त्यावर दिवे बसविण्याचे काम पूर्ण केले. या सौर पथदिव्यांमुळे वाडी-वस्त्यांमध्ये रात्रीच्या वेळी उजेडाची सुविधा उपलब्ध झाली असून साक्षरता वर्ग अधिक सुरळीतपणे भरू लागले आहेत. ग्रामस्थांनाही रात्रीच्या वेळी दैनंदिन कामांसाठी या दिव्यांचा उपयोग होत आहे. या उपक्रमासाठी कुरकुंडी येथील मायाताई जावळे आणि कोये येथील हौसाताई डांगले यांनी विशेष पुढाकार घेतला. त्यांच्या प्रयत्नांमुळे साक्षरता वर्गांमध्ये उपस्थिती वाढली असून नागरिकांची गैरसोय प्रमाणात दूर झाली आहे.

## सारांश वृत्त

### मुख्यमंत्रीपदासाठी इच्छुका जास्त

**म्हैसूर (कर्नाटक) :** काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार के. एन. राजण्णा यांनी गुरुवारी सांगितले की, नेतृत्वबदल झाल्यास सत्ताधारी पक्षातील एआयसीसी अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह डझनहून अधिक नेते कर्नाटकचे मुख्यमंत्री होऊ शकतात. डी. के. शिवकुमार यांना या पदासाठी "अधिक महत्त्वाकांक्षा" आहे, कारण ते पक्षाचे प्रदेशाध्यक्षही आहेत. काँग्रेस हायकमांडला नेतृत्वबदलाच्या मुद्द्यावर लवकरात लवकर निर्णय घेण्याचे आवाहन केले.

### बंगाल प्रकरणी सर्वोच्च न्यायालयातच न्याय

**श्रीनगर** : पश्चिम बंगाल निवडणुकीतील कथित गैरव्यवहारासंदर्भातील वाद देशाच्या सर्वोच्च न्यायालयात पोहोचल्यास, सर्वोच्च न्यायालय न्याय देईल, अशी आशा नॅशनल कॉन्फरन्सचे (एनसी) अध्यक्ष फारूक अब्दुल्ला यांनी गुरुवारी व्यक्त केली. पक्षाच्या प्रांतीय समितीच्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना अब्दुल्ला म्हणाले की, निवडणुकीच्या निकालांवर सर्वजण प्रश्न उपस्थित करत आहेत. ममता करत आहेत, अखिलेश प्रश्न उपस्थित करत आहेत, मला आशा आहे की ते हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात नेतील आणि सर्वोच्च न्यायालय यावर न्याय देईल," असे नॅशनल कॉन्फरन्सचे प्रमुख म्हणाले.

### तो पीए नसता तर वाचला असता

**कोलकाता** : भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांनी गुरुवारी दावा केला की, जर त्यांचे वैयक्तिक सहाय्यक चंद्रनाथ रथ त्यांच्यासाठी काम करत नसते, तर कदाचित त्यांची हत्या झाली नसती. तसेच, पोलीस हल्लेखोरांना अटक करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. त्यांनी असा आरोप केला की रथ यांच्या हत्येमध्ये सुपारी किलर सामील होते आणि त्यांच्या सहकाऱ्याचे कोणतेही राजकीय वैर नव्हते असा दावा केला. रथ यांचे पार्थिव अंत्यविधीसाठी पूर्व मेदिनीपूर जिल्ह्यातील त्यांच्या मूळ गावी चंदीपूर येथे नेण्यापूर्वी बोलताना, अधिकारी यांनी माध्यमांशी संवाद साधला.

## भारताने पाकिस्तानला दिला पुन्हा इशारा

# ऑपरेशन सिंदूर ही केवळ सुरुवात

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने गेल्या वर्षी पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर मोठी कारवाई करत 'ऑपरेशन सिंदूर' राबवले होते. गुरुवारी या धाडसी मोहिमेला एक वर्ष पूर्ण होत असताना भारताने पाकिस्तानला पुन्हा एकदा कठोर इशारा दिला आहे. या ऑपरेशनचे नेतृत्व करणाऱ्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "ऑपरेशन सिंदूर हा शेवट नव्हता, ती तर केवळ सुरुवात होती." दहशतवादाविरोधातील भारताचा लढा भविष्यातही अधिक कठोरपणे सुरू राहणार असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

२२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे पाकिस्तानपुरस्कृत दहशतवाद्यांनी भीषण हल्ला करत २६ निष्पाप नागरिकांची हत्या केली होती. या घटनेनंतर देशभरातून संताप व्यक्त होत असताना भारतीय सशस्त्र दलांनी ७ मेच्या मध्यरात्री 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केले. या मोहिमेत पाकिस्तान आणि पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील लष्कर-ए-तोयबा व जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनांचे अनेक तळ उद्ध्वस्त करण्यात आले. भारतीय लष्कराच्या माहितीनुसार, या कारवाईत १०० हून अधिक दहशतवादी ठार झाले होते. ऑपरेशनच्या पहिल्या वर्षपूर्तीनिमित्त राजस्थानमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत लष्करी कारवायांचे महासंचालक लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी भारताची भूमिका स्पष्ट केली. "आमचा उद्देश केवळ खळबळ उडवणे नाही, तर परिस्थितीत कायमस्वरूपी बदल घडवून आणणे आहे," असे ते म्हणाले. प्रसिद्ध कवी दुष्यंत कुमार यांच्या ओळींचा उल्लेख करत त्यांनी भारत दहशतवादाला कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नसल्याचे अधोरेखित केले.

जनरल घई यांनी सांगितले की, ऑपरेशन सिंदूर हे भारताच्या सामरिक धोरणातील महत्त्वाचे पाऊल ठरले. भारताने प्रथमच अत्यंत समन्वित आणि नियोजनबद्ध पद्धतीने सीमापार दहशतवादी तळांवर थेट कारवाई केली. या मोहिमेमुळे पाकिस्तानवर मोठा दबाव निर्माण झाला आणि अखेरीस त्यांना शस्त्रसंधीची विनंती करावी लागली, असेही त्यांनी नमूद केले. या ऑपरेशनमध्ये लेफ्टनंट जनरल राजीव घई यांच्यासह एअर मार्शल ए. के. भारती आणि व्हाईस ॲडमिरल ए. एन. प्रमोद यांनी नेतृत्व केले होते. भारतीय लष्कर, हवाई दल आणि नौदल यांच्या संयुक्त कारवाईमुळे दहशतवादी नेटवर्कला मोठा फटका बसल्याचे संरक्षण तज्ज्ञ मानत आहेत.

दरम्यान, 'ऑपरेशन सिंदूर'च्या वर्षपूर्तीनिमित्त इस्रायलनेही भारताला ठाम पाठिंबा दर्शवला आहे. भारतातील इस्रायली राजदूत रेउवेन अझार यांनी सोशल मीडियावर संदेश देत दहशतवाद्यांना आता कुठेही सुरक्षित आश्रय उरणार नसल्याचे म्हटले. दहशतवादाविरोधातील लढ्यात भारत आणि इस्रायल एकत्र उभे असल्याचा संदेश त्यांनी दिला.

भारतीय संरक्षण दलांनी स्पष्ट केले आहे की, देशाच्या सार्वभौमत्वावर किंवा नागरिकांच्या सुरक्षेवर कुठलाही धोका निर्माण झाल्यास भारत आवश्यक त्या सर्व कारवाया करण्यास सक्षम असून भविष्यातही दहशतवाद्यांविरोधात कठोर भूमिका कायम ठेवली जाईल.

## उत्तर प्रदेश एटीएसची मोठी कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लखनौ** : उत्तर प्रदेश एटीएस ने पाकिस्तानच्या गुप्तचर संस्था आयएसआय शी संबंध असल्याच्या संशयावरून दोन तरुणांना अटक केली आहे. राज्यभरात दहशतवादी कारवाया घडवून आणण्याच्या कटात त्यांचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून, या प्रकरणामुळे सुरक्षा यंत्रणांमध्ये खळबळ उडाली आहे.

अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे दानियाल अश्रफ (वय २३, रा. बाराबंकी) आणि कृष्णा मिश्रा (वय २०, रा. कुशीनगर) अशी आहेत. दोघेही शिक्षणाने आठवी नापास असल्याचे तपासात समोर आले आहे. एटीएसच्या माहितीनुसार, या दोघांनी उत्तर प्रदेश, दिल्ली आणि महाराष्ट्रातील काही संवेदनशील ठिकाणांची रेकी केली होती. तसेच विविध बँक खात्यांद्वारे निधी स्वीकारल्याचे पुरावेही तपास यंत्रणांना मिळाले आहेत. तपास अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, पाकिस्तानस्थित गुंड शहजाद भट्टी याच्यासह आबिद जट्ट आणि हम्माद हे या कारवायांचे सूत्रधार असल्याचा संशय आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, इंस्टाग्राम आणि एनक्रिप्टेड कॉल्सच्या माध्यमातून हे आरोपी भारतीय तरुणांना कट्टरपंथी बनवून स्लीपर सेल म्हणून वापरण्याचा प्रयत्न करत होते, असा दावा एटीएसने केला आहे.

अधिकृत निवेदनानुसार, पाकिस्तान-समर्थित नेटवर्क सोशल मीडियाद्वारे भारतीय तरुणांची भरती करत होते. संशयितांनी काही पोलीस ठाण्यांचे, सरकारी इमारतींचे आणि संवेदनशील ठिकाणांचे व्हिडिओ, छायाचित्रे आणि लोकेशन पाकिस्तानस्थित सूत्रधारांना पाठवल्याचे उघड झाले आहे.

दानियाल अश्रफने दहशतवादी हल्ल्यांसाठी शस्त्रे आणि निधीची मागणी केली होती. कृष्णा मिश्राच्या मोबाईलमध्ये गणवेशधारी जवानांवर गोळीबार करण्याबाबत चर्चा करणारे व्हिडिओ आणि काही संभाव्य लक्ष्यांची पाळत ठेवलेले फुटेज सापडले आहे. या दोघांकडून अग्निशस्त्रे, जिवंत काडतुसे आणि मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत.

## भाजपकडून भगवंत मान यांना नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चंदीगड** : पंजाबमधील अलीकडील बॉम्बस्फोटांसाठी भाजपला जबाबदार ठरवणाऱ्या भगवंत मान यांच्या वक्तव्यावरून मोठा राजकीय वाद निर्माण झाला आहे. भारतीय जनता पक्ष चे राष्ट्रीय सरचिटणीस तरुण चुघ यांनी मुख्यमंत्री मान यांना कायदेशीर नोटीस पाठवत सात दिवसांत सार्वजनिक माफी मागण्याची मागणी केली आहे.

नोटीसमध्ये म्हटले आहे की, मुख्यमंत्री मान यांनी कोणताही पुरावा नसताना भाजपवर गंभीर आरोप करून पक्षाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच या वक्तव्यामुळे भाजप कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या गेल्या असल्याचा दावा करण्यात आला आहे. यात इशारा देण्यात आला आहे की, सात दिवसांत जाहीर माफी न मागितल्यास विविध कलमांखाली कारवाई केली जाईल.

भाजपने आपल्या नोटीसमध्ये मुख्यमंत्री मान यांच्या विधानाला "बेजबाबदार, खोटे, बदनामीकारक आणि भडकाऊ" असे संबोधले आहे. मुख्यमंत्रीपदासारख्या उच्च घटनात्मक पदावर असताना अशा प्रकारचे वक्तव्य करणे गंभीर असल्याचे भाजपने म्हटले आहे.

नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे की, पंजाबचे डीजीपी गौरव यादव यांनी अलीकडील स्फोटांमागे आयएसआय समर्थित नेटवर्क आणि परदेशी शक्तींचा हात असण्याची शक्यता व्यक्त केली होती. त्यामुळे मुख्यमंत्री मान यांचे भाजपविरोधी आरोप पूर्णपणे निराधार ठरतात, असा दावा भाजपने केला आहे. मुख्यमंत्री मान यांच्या विधानांमुळे पाकिस्तानमधील राष्ट्रविरोधी शक्तींना बळ मिळत आहे, असेही पक्षाने म्हटले आहे.

## काँग्रेसच्या विजयात मुस्लिमांचा 'हात'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : चार राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेसची कामगिरी एकूणच अपेक्षेपेक्षा कमी राहिली. मात्र, या निवडणूक निकालांच्या विश्लेषणातून एक महत्त्वाचा राजकीय कल स्पष्टपणे समोर आला आहे. काँग्रेस आणि तिच्या मित्रपक्षांना मिळालेल्या विजयामध्ये मुस्लिमबहुल मतदारसंघांचा आणि मुस्लिम उमेदवारांचा मोठा वाटा असल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहे.

आसाममध्ये काँग्रेसच्या कामगिरीने विशेष लक्ष वेधून घेतले. पक्षाच्या विजयी १९ आमदारांपैकी तब्बल १८ आमदार मुस्लिम समाजातील आहेत. काँग्रेसला सर्वाधिक यश मुस्लिम लोकसंख्या अधिक असलेल्या भागांमध्ये मिळाल्याचे दिसून आले. मुस्लिम समाजातील एकूण २२ उमेदवार विजयी झाले असून, त्यापैकी पाच मतदारसंघांमध्ये ९० टक्क्यांहून अधिक मुस्लिम लोकसंख्या आहे. सहा मतदारसंघांमध्ये ८० टक्क्यांपेक्षा जास्त, तर आठ मतदारसंघांमध्ये ६० टक्क्यांपेक्षा अधिक मुस्लिम मतदार आहेत.

केरळमध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडीला (यूडीएफ) चांगले यश मिळाले असले, तरी तेथेही मुस्लिम मतदारांची भूमिका निर्णायक ठरल्याचे दिसते. राज्यातील ३५ मुस्लिम आमदारांपैकी ३० आमदार यूडीएफचे आहेत. यामध्ये काँग्रेसचे आठ, तर इंडियन युनियन मुस्लिम लीगचे २२ आमदार आहेत. काँग्रेसच्या मुस्लिम उमेदवारांनी निलंबूर, पोन्नानी, कल्पेट्टा, अलुवा, अरूर, कोची, चडयमंगलम आणि वामनपुरम यांसारख्या मतदारसंघांत विजय मिळवला. या बहुतांश भागांमध्ये मुस्लिम लोकसंख्या लक्षणीय प्रमाणात असल्याचे २०११ च्या जनगणनेतून स्पष्ट झाले आहे.

पश्चिम बंगालमध्ये काँग्रेसला केवळ दोन जागा जिंकता आल्या — फरक्का आणि राणीनगर. या दोन्ही मतदारसंघांमध्ये मुस्लिम मतदार निर्णायक संख्येत आहेत. फरक्कामध्ये सुमारे ६७ टक्के, तर राणीनगरमध्ये जवळपास ८० टक्के मुस्लिम लोकसंख्या आहे. दोन्ही ठिकाणी मुस्लिम उमेदवार विजयी झाले. या निकालांनंतर काँग्रेसच्या निवडणूक रणनीतीवर आणि मतपेढीच्या राजकारणावर नव्याने चर्चा सुरू झाली आहे. विरोधक काँग्रेसवर विशिष्ट मतदारवर्गावर अवलंबून असल्याचा आरोप करत आहेत, तर काँग्रेसकडून हे विविध समाजघटकांचा मिळालेला पाठिंबा असल्याचे सांगितले जात आहे.

## अधिकारी यांच्या निकटवर्तीयाच्या हत्येनंतर तणाव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांचे निकटवर्तीय चंद्रनाथ रथ यांच्या हत्येनंतर पश्चिम बंगालमध्ये राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. उत्तर २४ परगणा जिल्ह्यात बुधवारी रात्री झालेल्या या गोळीबार प्रकरणाचा तपास आता वेगाने सुरू असून, पोलिसांनी हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी अनेक विशेष पथके तयार केली आहेत. तसेच या हत्येमध्ये व्यावसायिक सुपारी किलरचा सहभाग होता का, याचाही तपास सुरू असल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली.

रथ यांच्या हत्येनंतर मध्यमग्राम, दोहरिया आणि आसपासच्या भागात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. गुरुवारी सकाळपासून या भागांत मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. भाजप कार्यकर्त्यांनी आरोपींना तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी आंदोलन छेडल्याने परिस्थिती अधिक संवेदनशील बनली. पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन करत शांतता राखण्याची विनंती केली आहे. बुधवारी रात्री सुमारे साडेदहा वाजता मध्यमग्राममधील डोलतळा परिसरात मोटारसायकलवरून आलेल्या हल्लेखोरांनी चंद्रनाथ रथ यांच्या वाहनाचा पाठलाग केला. त्यानंतर वाहन अडवून अगदी जवळून गोळीबार करण्यात आला. हल्ल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. या हल्ल्यात रथ यांचा जागीच मृत्यू झाला, तर वाहन चालक बुद्धदेव बेरा हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर कोलकात्यातील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांच्या प्राथमिक अंदाजानुसार, हल्लेखोरांनी सहा ते दहा गोळ्या झाडल्या असाव्यात. घटनास्थळावरील आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे.

## उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या यादीत नाव कायम

# यशवंत वर्मा यांचा राजीनामा प्रलंबित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : दिल्ली उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून कार्यरत असताना न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणात रोकड सापडल्याच्या प्रकरणामुळे देशभरात मोठी खळबळ उडाली होती. विशेष म्हणजे, या रोकडीपैकी काही रक्कम जळालेल्या अवस्थेत आढळल्याने प्रकरण अधिकच गंभीर बनले. या घटनेनंतर त्यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्यात आली होती. तसेच, संसदेने त्यांच्याविरुद्ध महाभियोगाची प्रक्रिया सुरू करण्याचाही विचार केला होता.

दरम्यान, न्यायमूर्ती वर्मा यांनी अलीकडेच आपल्या पदाचा राजीनामा दिला असला, तरी ते अद्याप अधिकृतपणे न्यायाधीश पदावर कायम असल्याचे दिसून येत आहे. कारण, त्यांच्या राजीनाम्यावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अद्याप अंतिम निर्णय घेतलेला नसल्याचे मानले जात आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या अधिकृत पोर्टलवरील न्यायाधीशांच्या यादीत त्यांचे नाव अजूनही कायम असून, अलाहाबाद खंडपीठातील वरिष्ठतेच्या क्रमवारीत ते तिसऱ्या स्थानावर आहेत. त्यांच्या पुढे केवळ न्यायमूर्ती एम. सी. त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अरिंदम सिन्हा यांची नावे आहेत.

अलाहाबाद उच्च न्यायालयात सध्या अलाहाबाद आणि लखनौ या दोन्ही ठिकाणी न्यायाधीश कार्यरत आहेत. लखनौ खंडपीठात २८ न्यायाधीश, तर अलाहाबादमध्ये ७९ न्यायाधीश कार्यरत आहेत. अशा परिस्थितीत न्यायमूर्ती वर्मा यांचे नाव अजूनही अधिकृत यादीत असल्याने त्यांच्या राजीनाम्याच्या प्रक्रियेबाबत चर्चा सुरू झाली आहे.

न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी ९ एप्रिल रोजी राष्ट्रपतींना पत्र लिहून राजीनामा दिला होता. आपल्या पत्रात त्यांनी म्हटले होते की, "तुमच्या पवित्र कार्यालयापर्यंत कोणतीही अनुचित माहिती पोहोचू नये अशी माझी इच्छा आहे. अशा प्रकरणांमध्ये माझे नाव गोवले गेल्याने मला तीव्र दुःख झाले आहे. या परिस्थितीत, मी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश पदाचा तात्काळ राजीनामा देत आहे." त्यांनी हा राजीनामा तत्काळ प्रभावाने लागू व्हावा, असेही स्पष्ट नमूद केले होते.

भारतीय राज्यघटनेतील कलम २१७(१) नुसार, एखाद्या उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाने राष्ट्रपतींना लेखी स्वरूपात राजीनामा दिल्यास तो संबंधित तारखेपासून प्रभावी मानला जातो. जर राजीनामा "तात्काळ प्रभावाने" दिला असेल, तर तो तत्काळ लागू होतो. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने १५ फेब्रुवारी १९७८ रोजी न्यायमूर्ती गोपाल चंद्र मिश्रा प्रकरणात दिलेल्या निकालातही हेच स्पष्ट केले होते की, न्यायाधीशाचा राजीनामा राष्ट्रपतींकडे सादर झाल्यानंतर नमूद तारखेपासून प्रभावी ठरतो.

न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांचे प्रकरण माजी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्या खंडपीठासमोरही आले होते. त्या वेळी न्यायालयाने त्यांची फाईल राष्ट्रपती आणि पंतप्रधानांकडे पाठवून त्यांना पदावरून दूर करण्याची प्रक्रिया सुरू करण्याबाबत मत व्यक्त केले होते. त्यामुळे आता राष्ट्रपती कार्यालयाकडून त्यांच्या राजीनाम्याबाबत काय निर्णय घेतला जातो, याकडे न्यायव्यवस्था आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## तामिळनाडूत सत्तास्थापनेचा पेच कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई** : तामिळनाडू विधानसभा निवडणुकीनंतर निर्माण झालेल्या त्रिशंकू परिस्थितीत सरकार स्थापनेवरून राजकीय हालचालींना वेग आला आहे. तामिळगा वेट्री कळघम (टीव्हीके) पक्षाचे अध्यक्ष विजय यांनी सलग दुसऱ्या दिवशी राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांची लोक भवन येथे भेट घेत सत्तास्थापनेबाबत सविस्तर चर्चा केली. मात्र, सरकार स्थापनेसाठी आवश्यक असलेला ११८ आमदारांचा बहुमताचा आकडा सिद्ध करण्याचा आग्रह राज्यपालांनी कायम ठेवला आहे.

सुमारे अर्धा तास चाललेल्या बैठकीत राज्यपालांनी स्पष्टपणे सांगितले की, टीव्हीकेकडे अद्याप आवश्यक बहुमत नसल्याने सरकार स्थापनेसाठी औपचारिक निमंत्रण देता येणार नाही. सूत्रांच्या माहितीनुसार, विजय यांनी विश्वासदर्शक ठरावाला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली असली तरी राज्यपालांनी सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या निर्णयांचा दाखला देत पुरेसा पाठिंबा सिद्ध करण्याची अट कायम ठेवली. टीव्हीकेने पहिल्याच विधानसभा निवडणुकीत १०८ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष म्हणून उदय घेतला आहे. काँग्रेसच्या पाच आमदारांनी विजय यांना पाठिंबा दिला असून, एकूण ११३ आमदारांची पाठिंबा पत्रे राज्यपालांकडे सादर करण्यात आली आहेत. तरीही सरकार स्थापनेसाठी आवश्यक असलेल्या बहुमतापेक्षा टीव्हीके पाच जागांनी कमी पडत आहे.

राज्यपालांनी सरकार स्थापनेचा दावा करणाऱ्या पक्षाकडे स्पष्ट बहुमत आहे का, याची खात्री करणे आवश्यक असल्याचे सांगितले. यासाठी त्यांनी भारताचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एआरएल सुंदरेशन यांचे कायदेशीर मत घेतल्याचेही समजते. टीव्हीकेने स्वतःला आघाडीचा भाग म्हणून मांडल्याने त्यांना इतर पक्षांचा ठोस पाठिंबा दाखवावा लागेल, असे राज्यपाल कार्यालयाचे मत आहे.

दरम्यान, डीएमकेचे मित्रपक्ष व्हीसीके, सीपीआय आणि एमएनएम यांनी विजय यांना सरकार स्थापनेसाठी संधी द्यावी, अशी भूमिका घेतली आहे. डीएमके अध्यक्ष एम. के. स्टॅलिन यांनीही सार्वजनिकरीत्या विजय यांना सरकार स्थापनेसाठी आमंत्रित केले पाहिजे, असे म्हटले आहे.

## भाजप नेत्यांनी डीपी बदलले

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी 'ऑपरेशन सिंदूर'ला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आपल्या सोशल मीडिया हँडलवरील डिस्प्ले पिक्चर बदलले आणि सशस्त्र दलांप्रति व त्यांच्या यशाप्रती आदर व्यक्त करण्यासाठी सर्वांनाही असेच करण्याचे आवाहन केले. ऑपरेशन सिंदूरला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने, राजनाथ सिंह, अमित शाह आणि एस. जयशंकर यांच्यासह सर्व मंत्री, भाजप अध्यक्ष नितीन नवीन आणि इतर नेत्यांनीही प्रोफाइल पिक्चर्स बदलले.

## विजयच्या चाहत्यांची झाली निराशा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई** : विजय यांना मुख्यमंत्री म्हणून पाहण्याच्या आशेने राज्यभरातून आलेल्या शेकडो तामिळगा वेट्री कळघम (टीव्हीके) समर्थकांची गुरुवारी मोठी निराशा झाली. शहरातील नेहरू इनडोअर स्टेडियम येथे जमलेल्या समर्थकांना बंद दरवाजे आणि नियोजित कार्यक्रमाबाबत कोणतीही अधिकृत माहिती नसल्याचे आढळून आले.

सकाळपासूनच अनेक समर्थक स्टेडियमबाहेर जमा झाले होते. मात्र, कार्यक्रमाविषयी स्पष्ट माहिती न मिळाल्याने आणि प्रवेशद्वार बंद असल्याने वातावरणात संभ्रम निर्माण झाला. अनेकांनी सोशल मीडिया आणि वृत्तांमधून काही मोठी घोषणा होणार असल्याचे समजून येथे धाव घेतल्याचे सांगितले. समर्थक चारुलता यांनी आपली भावना व्यक्त करताना सांगितले, "आज विजय मुख्यमंत्री होतील या आशेने आम्ही खूप आनंदात आलो होतो. पण येथे काहीच व्यवस्था नाही. दरवाजे बंद आहेत. हे खूप वेदनादायी आहे." त्यांची मुलगी आणि बारावीत प्रवेश घेणारी विद्यार्थिनी साई दीपिका हिनेही उत्साह व्यक्त करत म्हटले, "मला येथे येऊन खूप आनंद झाला आहे. मी सर्वांना सांगत होते की विजय जिंकतील आणि लोकांसाठी चांगले काम करतील."

दरम्यान, दीर्घकाळ एआयएडीएमके समर्थक राहिलेल्या गुणसुंदरी यांनी आपण आता विजय यांना पाठिंबा देत असल्याचे सांगितले. समर्थकांचा विजय यांच्यावरील विश्वास कायम असल्याचे दिसून आले.

## इस्रायलचा भारताला ठाम पाठिंबा, दहशतवाद्यांना दिला इशारा

# दहशतवाद्यांना लपण्यासाठी जागा उरली नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : 'ऑपरेशन सिंदूर'च्या पहिल्या वर्षपूर्तीनिमित्त इस्रायलने भारताला पुन्हा एकदा ठाम पाठिंबा दर्शवला असून दहशतवादाविरोधातील भारताच्या कारवाईचे खुलेपणाने समर्थन केले आहे. भारतातील इस्रायली राजदूत रुवेन अझर यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर प्रतिक्रिया देताना दहशतवाद्यांना थेट इशारा दिला की, "निष्पाप नागरिकांवर हल्ले करणाऱ्यांना आता लपण्यासाठी कोणतीही सुरक्षित जागा उरलेली नाही."

पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानच्या भूमीवर कार्यरत दहशतवादी तळांवर केलेल्या प्रत्युत्तरात्मक कारवाईची आठवण करून देत इस्रायलने भारताच्या भूमिकेचे कौतुक केले आहे. राजदूत अझार यांनी आपल्या संदेशात म्हटले की, "ऑपरेशन सिंदूरला एक वर्ष पूर्ण झाले आहे. निरपराध लोकांविरुद्ध घृणास्पद गुन्हे करणाऱ्या दहशतवाद्यांना आता सुरक्षित आश्रयस्थान नाही, हे त्यांना स्पष्टपणे समजले आहे."

गेल्या वर्षी जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर देशभर संतापाची लाट उसळली होती. हल्ल्यास जबाबदार असलेल्या दहशतवादी संघटनांविरोधात कठोर कारवाई करण्याचा निर्धार केंद्र सरकारने व्यक्त केला होता. त्यानंतर भारतीय संरक्षण दलांनी 'ऑपरेशन सिंदूर' राबवत पाकिस्तानमधील दहशतवादी तळ आणि प्रशिक्षण केंद्रांवर अचूक हल्ले केले. गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या या कारवाईत अनेक दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यात आले होते.

भारताच्या या भूमिकेला इस्रायलने सातत्याने पाठिंबा दिला आहे. दहशतवादाविरोधातील लढ्यात भारत आणि इस्रायल यांच्यातील सामरिक सहकार्य अधिक मजबूत झाले आहे. गुप्तचर माहितीची देवाणघेवाण, अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञान, उपग्रह प्रणाली आणि ड्रोन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून इस्रायल भारताला महत्त्वाची मदत करत आहे.

यापूर्वी कारगिल युद्धा वेळीही इस्रायलने भारताला लेझर-गाईडेड बॉम्ब आणि मानवरहित हवाई यंत्रणा पुरवल्या होत्या. तसेच बालाकोट वेळी भारतीय हवाई दलाने इस्रायली बनावटीच्या 'स्पाईस २०००' बॉम्बचा वापर करून दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले होते. सीमावर्ती भागांमध्ये घुसखोरी रोखण्यासाठी भारत सध्या इस्रायली स्मार्ट फेन्सिंग, रडार आणि हेरॉन ड्रोन तंत्रज्ञानाचाही वापर करत आहे.

दहशतवादाविरोधात 'शून्य सहनशीलता' ही भूमिका स्वीकारणारे भारत आणि इस्रायल हे दोन्ही देश गेल्या अनेक दशकांपासून सीमापार दहशतवादाचा सामना करत आहेत. त्यामुळे सुरक्षा आणि दहशतवादविरोधी कारवाईच्या मुद्द्यावर दोन्ही देशांमध्ये मजबूत सामरिक भागीदारी निर्माण झाली आहे.